# जनसंपर्क अधिकारी

**मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २५६-२२** **दिनांक १७/०८/२०२२**

## गावठी कट्टा बाळगणाऱ्या आरोपीतास गजाआड करण्यात पेल्हार पोलीस ठाणेच्या गुन्हे प्रकटीकरण पथकास यश.

दिनांक १६/०८/२०२२ रोजी पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत बटरपाडा, नालासोपारा (पु.), ता. वसई, जि. पालघर येथे एक इसम त्याचे कब्जात विना परवाना व बेकायदेशिररित्या अग्निशस्त्र बाळगुन घेवुन येणार असल्याची खात्रीशिर बातमी पेल्हार पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोअं/बालाजी गायकवाड यांना मिळाली. सदरची बातमी गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनि/सनिल पाटील यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. चौगुले यांना दिली असता त्यांनी मिळालेल्या बातमीची शहानिशा करुन पुढील कायदेशिर कारवाई करण्याचे आदेश दिले. त्याबाबत दिनांक १६/०८/२०२२ रोजी सायंकाळच्या सुमारास वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली बटरपाडा, नालासोपारा याठिकाणी सापळा लावून संशईत यास शिताफिने ताब्यात घेवुन त्याचेकडे विचापुस करता, त्याने त्याचे नाव- विलास तुंबडा, रा. बटरपाडा, पो. पेल्हार, नालासोपारा (पु.) असे सांगुन सदर इसमाकडे मिळालेल्या बातमीचे अनुषंगाने चौकशी केली असता तो उडवा-उडवीचे उत्तरे देवु लागल्याने त्याची अंगझडती घेतली असता त्याचे कब्जात ५,०००/- रुपये किंमतीचा एक गावठी कट्टा मिळुन आल्याने जप्त करण्यात आला आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने पेल्हार पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं. I ७०३/२०२२ भारतीय शस्त्र अधिनियम-१९५९ चे कलम-३, २५ प्रमाणे दिनांक १६/०८/२०२२ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असुन पुढील तपास सुरु आहे.

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पेल्हार पोलीस ठाणे, श्री. महेंद्र शेलार, पोलीस निरीक्षक (पेल्हार), व गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोउपनि/सनिल पाटील, पोहवा/योगेश देशमुख, तुकाराम माने, पोना/प्रताप पाचुंदे, पोअं/संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड, रोशन पुरकर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.